REVIEW OF RESEARCH

IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# सिझर कर म्हणतेय माती — एक चिकित्सा




**प्रा. डॉ. आनंदा गांगुर्डे**
**विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय, बारामती.**

**गोषवारा**

*कविता हा मराठी साहित्यातील अत्यंत संवेदनशील साहित्यप्रकार आहे. मनातील भावभावनांचा हुंकार जितक्या हळुवारपणे कवितेत अभिव्यक्त होतो तितका तो अन्य साहित्यप्रकारात क्वचितच आढळतो. याचे कारण कवितेचे नाते मानवी हृदयाशी असते. कवी आणि रसिक संवेदनशील असल्याशिवाय काव्यनिर्मिती व काव्यास्वाद ही प्रक्रिया सुरु होत नाही. काव्यानुभूतीचा संवेदनशील आविष्कार कल्पना दुधाळ यांच्या 'सिझर कर म्हणतेय माती' या ग्रामीण काव्यसंग्रहात पहावयास मिळतो. ग्रामीण कवितेत मैलाचा दगड ठरलेला हा काव्यसंग्रह आहे. यात ग्रामीण परिसरातील शेतकऱ्यांचं दु:ख, दैन्य, दारिद्रय यासोबतच बळिराजा हा लाखाचा पोशिंदा कसा आहे याचे चित्रण आलेले आहे. मुळात कल्पना दुधाळ या अत्यंत संवेदनशील कवयित्री आहेत. त्यांच्यावर बहिणाबाई चौधरी यांच्या काव्याचा प्रभाव आहे. ग्रामीण कवितेत शेतकरी जीवनाचा खराखुरा आविष्कार 'सिझर कर म्हणतेय माती' या काव्यसंग्रहातून वारंवार प्रत्ययास येतो.*

**की वर्डस :** सिझर, ग्रामीण कविता

संवेदनक्षमतेविषयी प्रा. अरविंद वामन कुळकर्णी लिहितात, ''संवेदनक्षमता म्हणजे भावविवशता किंवा हळवेपणा नव्हे. कोणत्याही अनुभवातील सूक्ष्मातिसूक्ष्म बारकावे टिपण्याची क्षमता म्हणजे संवेदनक्षमता. साहित्यकृतीतील भावनेचे आरोह—अवरोह व परिपोष या क्षमतेमुळेच सुयोग्य व परिणामकारक होतात. ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांविषयीची साक्षात प्रतीती आस्वादकाला घडवून देणे यामुळेच लेखक व कवीला जमते. बालकवी हा कवी आणि दुर्गा भागवत या ललित गद्य लेखिका ही मराठीतील अशी उदाहरणे होत.''[1] यावरुन कवी आणि रसिक हे दोघेही संवेदनक्षम असल्याशिवाय काव्यव्यापार सुरळीत होत नाही. हे प्रकर्षाने लक्षात घ्यावे लागते.ग्रामीण कविता हे संवेदनक्षमतेचे उत्तम उदाहरण आहे. बहिणाबाई, भा.रा.तांबे, ग.ल.ठोकळ, ग.ह.पाटील, यासारख्या कवींनी ग्रामीण कविता लिहिली. पण ग्रामीण कवितेला खरा बहर आला तो साठोत्तर काळात. या काळात आनंद यादव, विठ्ठल वाघ, ना.धो. महानोर, शंकर बडे, नारायण सुमंत, इंद्रजित भालेराव, प्रकाश होळकर आदी कवींनी ग्रामीण कवितेचे दालन समृध्द केले. यांची कविता आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने लक्षवेधी ठरली. याचे कारण या कवींचा अनुभव उसना नव्हता. या सर्वांनी स्वत: शेतातील अनुभव घेतलेला होता. ग्रामजीवन स्वत: अनुभवले होते. काल्पनिक खेडे न रंगविता वास्तवातील गावाचे चित्रण त्यात आले होते. शेती, शेतकरी, माती, पाऊस, दुष्काळ, जीवनसंघर्ष, सावकाराचे कर्ज, सरकारचा निरुत्साह, काबाडकष्ट, शेतकऱ्याचे दु:ख, दैन्य, दारिद्रय या अनुभवातून ही कविता साकारल्यामुळे ती जीवंत वाटत होती. या काळातील कवितेविषयी डॉ. रवींद्र ठाकूर लिहितात, ''शहरीकरणाच्या प्रक्रियेत एक प्रकारचे दुभंगलेपण अनुभवणारा तरीही मनात गावाकडची माती जपू पाहणारा, बदलत्या वास्तवाला धीटपणे सामोरा जाणारा ग्रामीण कवी आपल्या अनुभवांशी प्रामाणिक राहून काव्यलेखन करतो. आपल्या भोवतालच्या वास्तवाकडे तो डोळसपणे पाहतो त्याचे विविध

संदर्भ आकलू पाहतो. अनेक कवी ग्रामीण भागात राहून ग्रामजीवनाशी समरस होऊन काव्यलेखन करीत आहेत.''[२] यावरुन ग्रामीण कवितेतील अनुभव काल्पनीक नसून तो वास्तववादी आहे. त्यामुळे तो जीवंत वाटतो.

या पार्श्वभूमीवर कल्पना दुधाळ यांचा 'सिझर कर म्हणतेय माती' हा ग्रामीण कवितांचा संग्रह अत्यंत हृदयस्पर्शी आहे. त्या स्वत: शेतात राबराब राबून, काबाडकष्ट करतात व आपल्या समस्त शेतकरी बांधवांच्या दु:खांना कवितेतून वाचा फोडतात. पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील बोरी भडक या गावात राहून प्रत्यक्ष शेतात काम करत—करत तीची कविता जन्माला आली. म्हणून कल्पना दुधाळ ही खऱ्या अर्थाने बहिणाबाईची लेक वाटते. शेती आणि मातीवर तिची नितांत श्रध्दा आहे. मातीत राबणाऱ्या शेतकऱ्याविषयी तिच्या मनात प्रचंड तळमळ आहे. म्हणून ''मातीत आणि मातीसाठी राबणाऱ्या हातांना..... ..'' तिने हा कवितासंग्रह मोठया कृतज्ञतेने अर्पण केला आहे. मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक—संपादक उत्तम कांबळे यांची आश्वासक प्रस्तावना या संग्रहाचे वाङ्मयीन मोल वाढविणारे आहे. या कवितांच्या निर्मितीप्रक्रियेविषयी बोलतांना त्या म्हणतात, ''लहानपणी सुगीच्या दिवसात आम्हा मुलांना 'पाखरांकडं जा' असं म्हणत रानात पाठवलं जायचं, मात्र तिथं गेल्यावर झाडाझुडपांच्या पानांच्या हिरव्यागार भाकरी, रानफुलांचं पिठलं आणि चिखलांचे सांडगे करुन खोटं—खोटं खातांना खऱ्या कणसांवरचे दाणे मात्र पाखरं मनसोक्त खाऊन जायची. नंतर हळूहळू समज येऊ लागली, तसं घरातल्या माणसांबरोबर शेतातील कामं करताना तो परिसर, ते कष्टाचं वातावरण मनात खोलवर मुरत राहिलं...... सासरी एकत्र शेतकरी कुटुंबातही पोटच्या लेकरागत शेतांवर, पिकांवर निखळ प्रेम करणारी माणसं मिळाली.''[३] हाच गावातला, शेतातला, मातीतला अनुभव त्यांच्या काव्यलेखनाची उर्जा आहे. सासरची व माहेरची मातीत राबणारी माणसं त्यांच्या कवितेची प्रेरणा आहे.

'सिझर कर म्हणतेय माती' यातील कविता शेतात काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांच्या दु:खाची अभंग गाथाच आहेत. कल्पना दुधाळ यांनी या सर्व कवितेतून खेडयापाडयात परिस्थितीने होरपळणाऱ्या शेतकऱ्याची वेदना बोलकी केली आहे. त्यादृष्टीने 'कणसांचे मरणोत्सव' ही कविता अंतर्मुख करणारी आहे.

खुडली जातात ढीगभर कणसं
टचटचीत दाण्यांची........लांबलचक दांडयांची
विस्तवावर निघतात होरपळून.....हुंडाबळीसारखी
चवदार हुरडयाची पार्टी रंगत जाते
पाखरांचं स्वप्न भंगत राहातं
तरीही गोफणीतून दगडं सुटत राहातात
आरोळयांचे आवाज येत राहातात.

'कणसांचे मरणोत्सव' ही कविता म्हणजे खेडयातील माणसांचा मरणोत्सवच आहे. आज गावोगावी हुरडा पार्टी रंगलेली दिसते. या हुरडयात भाजलेली कणसे कवयित्रीला हुंडाबळीसारखी दिसतात. शेतकरी दुष्काळात होरपळलेलाच असतो. शेतकऱ्याचे जीवन ज्वारीच्या कणसासारखेच असते. कधी आगीच्या भक्ष्यस्थानी पडावे लागेल याची कल्पना नसते. कणसांचा जीव जातो पण खाणाऱ्यांची पार्टी रंगत असते. जागतिकीकरणाचे संदर्भ या कवितेला आहेत. मृत्यूचा उत्सव होतो आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचाही उत्सव होतो आहे. सरकारी अनुदानातून वाजतगाजत धनादेश वाटप केले जातात. प्रसार माध्यमात प्रसिध्दी दिली जाते. दु:खात सहभागी होण्याऐवजी श्रेय लाटण्याची स्पर्धा असते. शेतकऱ्याचा मृत्यू धनादेश वाटून विकत घेण्याची बिभत्स रीत रुढ होताना दिसते आहे. मरणाचा उत्सव होणे हा प्रकार संवेदनशील मनाला चटका लावून जातो.

भारत हा कृषिप्रधान देश आहे पण येथे शेती व्यवसायाला प्राधान्यक्रम नाही. पिकांना संरक्षणाची हमी नाही. धन—धान्याला हमी भव नाही. शेतकऱ्याच्या कष्टांना मोल नाही. शेतकरी राजा असतो असे म्हटले जाते पण राजाचा थाट त्याच्या नशिबात नाही 'राजा' या कवितेत कवयित्री लिहिते,

महागाई भत्ता ....... पगारवाढ ...... वेतन आयोग ..... बोनस
यातलं काहीच नसतं कुणब्याला
त्याला नसतेच कुणी, वाली
तो नसतो कुणाचा बॉस
आणि नसतो कुणाच्या हाताखाली
तो तर राजा......
जन्मभर मातीत गाडून घेणारा
आणि नावरस होऊन.... पुन्हा पोटाला येणारा......

'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी, ही म्हण आता कालबाहय होऊन त्या जागी आता 'उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती' अशी नवी म्हण तयार झाली आहे. आता नोकरीला प्राधान्य दिले जाते आहे. शेतकरी नावापुरता राजा आहे. नोकरदार माणसांरखी पगारवाढ, वेतन आयोग, बोनस, महागाई भत्ता यासारखे आर्थीक लाभ त्याला मिळत नाही. त्याला कुणीच वाली नाही. सर्व बाजूने तो उपेक्षित आहे. जन्मभर मातीत गाडून घेणारा असा हा राजा कायमच परिस्थितीचा बळी ठरतो आहे. त्यात शेतकरी बाईचं दु:ख अजून वेगळं. सांगताही येत नाही आणि सहनही होत नाही 'बाय आणि गाय' या समदु:खी जीवांचं दु:ख खालील कवितेतून व्यक्त झालं आहे.

बाई ग तू काय नि मी काय
जन्मभर दावणीला बांधलेलो....
शरीरातून शरीर बाहेर पडलं
आणि रुजण्याची माती नापीक झाली, की
पडिकात कुणी फिरकत नाही.

बाय आणि गाय यांचा हा संवाद दोघींच्याही आयुष्याचा खडतर प्रवास सांगणारा. धन्याच्या दावणीला बांधलेली मुकी जित्राबं. मर्यादित स्वातंत्र्यात वावरणारी. बाई तर केवळ भोगवस्तू. सृजनापुरता तिचा उपयोग. तिची सर्जनक्षमता संपली की परवड सुरु. तेच दु:ख गाईच्या वाटयाला. वेत संपले की दूध देण बंद, मग ती खाटाड होते. बिनकामाची म्हणून ती कसायाला विकली जाते. मातीचेही असेच आहे. नापीक झाली की पडिकात कुणी फिरकत नाही. थोडक्यात काय तर उपयोग संपला की बिनकामाची. अशी दुर्देवी अवस्था गाय, माय आणि जमिन यांच्या वाटयाला येते. गाव आणि शहर यांच्यातील फरक 'गाव' या कवितेत व्यक्त झाला आणि जागतिकीकरणानंतर शहरं सुजत गेली आणि गावं ओस पडली याचे प्रत्ययकारी चित्रण कवयित्रीने खालील कवितेत केले आहे.

बोंडातला कापूस पिंजावा
तशी जमिनीवर उभी शहरं
आणि रिकाम्या बोंडासारखी गावं
..... पऱ्हाटीला चिकटून

१९९० नंतर जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. बहुराष्ट्रीय कंपन्या शहरात आल्या आणि हमखास रोजगारीची संधी उपलब्ध झाली. खेडयापाडयातून माणसांचे लोंढे शहरात दाखल झाले. परिणामी गावं ओस पडली. गावाचे गावपण संपले. शहरं मात्र कापसाच्या पांढऱ्याशुभ्र बोंडासारखी गुबगुबीत झाली. गाव मात्र कापूस गळून पडलेल्या रिकाम्या बोंडासारखं निस्तेज झालं. जागतिकीकरणाचे दूरगामी परिणाम गावाला भोगावे लागतात. असाच अनूभव 'मृद्गंध' या कवितेतील. डिजिटल होणाच्या नादात आपण आपल्या मूळ परंपरांना विसरत चाललोय. याची खंत कवयित्रीला वाटते.

उगवलेल्या गवतापासून ...... फिरलेल्या आभाळापर्यंत
वळलेल्या काठमुऱ्यापासून ...... मुसकी बाजंच्या काथ्यांपर्यंत
नक्षत्रांच्या वैशिष्टयांपासून...... पाखरांच्या विष्ठांपर्यंत
सारं ठावं होतं. ...... मागच्या पिढयांना
पण त्या माहितीचं ..... 'नॉलेज' कधीच झालं नव्हतं
आता कृषी शिक्षणाच्या डिजिटल धडयात
मृद्गंध शोधतोय आम्ही .................

मृद्गंध म्हणजे वळवाचा पाऊस कोसळल्यानंतर मातीचा सुटलेला सुगंध. हा सुगंध कारखान्यात तयार करता येत नाही. त्यासाठी पहिल्या धारेचा पाऊस आणि जमीन यांचं मीलन व्हावं लागतं. पण आज मात्र 'सेझच्या' नादात जमिनी एन. ए. झाल्या आणि या मृद्गंधास आपण पारखे झालो.

अशाप्रकारे कल्पना दुधाळ यांची कविता मातीतून उगवलेली आहे. ओल्या मातीतून मृद्गंध येतो तसा त्यांच्या शब्दाशब्दांतून मातीचा सुगंध जाणवतो. त्यांची प्रत्येक कविता मातीशी नातं सांगणारी आहे. 'सिझर कर म्हणतेय माती' हे शीर्षकही मोठे समर्पक आहे. ती म्हणते,

मी टाकलेली मेथी आणि कोथिंबीर....... मागतेय माझ्याकडे
युरियाचा खाऊ ....... आणि लुसलुशीत व्हायचं ....... स्पेअर
रखरखीत झाडाच्या सालीनं ....... मॉइश्चरायझरचा हट्ट धरलाय .........
........... आणि माती अडून बसलीय,
'सिझर' कर म्हणत ............ मी काय करु ?

या कवितेतील अनुभव स्त्रीच्या प्रसुत वेदनेशी निगडीत आहे. दिवस भरल्यानंतरही जेव्हा स्त्री नैसर्गिकरित्या प्रसुत होत नाही तेव्हा डॉक्टर सिझर करुन बाळाला आईपासून वेगळं करतात. परिणामी बाळ — बाळंतीणीचा जीव वाचवतात, आईला मोकळं करतात. तद्वतच शेतकऱ्याने पेरणी केल्यानंतर बी मातीच्या गर्भात गाडले जाते. मुसळधार पाऊस पडला की बीजांकुर मातीत दाबला जातो. नैसर्गिकरित्या तो वरती येत नाही. मातीच्या पोटात अंकुराचा कोंडमारा होतो. मातीला प्रसव कळा सहन होत नाही तेव्हा ती शेतकऱ्याला सिझर करण्यासाठी विनंती करते. येथे आई व काळी आई यांच्यातील सृजनक्षमतेतील साम्य दाखविणारी कल्पनाची कल्पना किती अफलातून आहे याचा प्रत्यय येतो. तिच्या कवितांविषयी जेष्ठ साहित्यिक — संपादक उत्तम कांबळे म्हणतात, ''कल्पना दुधाळची कविता रानभर, मनभर तर पसरतेच, शिवाय मातीच्या कणाकणावर गर्दी करु लागलेल्या जागतिकीकरण आणि त्यानं आणलेल्या विषाणूपर्यंतही पाहोचते. जागतिकीकरण पसरतंय आता आंब्याच्या फांदीपासून ......... हुरडयाच्या इव्हेन्टपासून ते गावच्या पांदीपर्यंत ..... शेतातल्या बांधापासून ते संसदेच्या उंबरठयापर्यंत .......... मॉर्डन शाळांपासून ते कत्तलखान्यात पोहोचलेल्या बैलांपर्यंत ......... आणि आत्महत्येपासून ते भाकरी आणि बर्गर यांच्यातील लढाईपर्यंत. हे सारं सारं टिपणारी आणि नव्या व्यवस्थेच्या पाठीवर नवा आसूड ओढणारी ही कविता म्हणून न्यारी वाटतेय.''[४] वेदनासहन करीत करीत व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह पुकारीत ही कविता शेतकऱ्याच्या अन्यायाला वाचा फोडते. खेडयातील वातावरणाशी समरस होऊन सबंध शिवार बोलकं करते. यावरुन कल्पना दुधाळ ही आजच्या काळातील आघाडीची कवयित्री आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## संदर्भ ग्रंथ

१. अ. वा. कुळकर्णी : 'साहित्यविचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे. द्वितीयावृत्ती: १५ जुलै १९९७, पृष्ठ : ६९.

२. डॉ. रवींद्र ठाकूर : 'मराठी ग्रामीण कविता', 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' सं. — प्रा. चंद्रकुमार नलगे, सुरेश एजन्सी, पुणे. प्रथम आवृत्ती, सप्टेंबर १९९६, पृष्ठ : १४०

३. कल्पना दुधाळ : दोन शब्द रुजव्यातून (मनोगत), 'सिझर कर म्हणतेय माती' नवसिध्दांत प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २०१०, पृष्ठ : ५
४. उत्तम कांबळे : ब्लर्ब, 'सिझर कर म्हणतेय माती'कल्पना दुधाळ, नवसिध्दांत प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २०१०.